# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सुभाष शिवाजी पोळ,<br>मु. पो. राजापूर, ता. तासगांव, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय क्र. २, तासगांव, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सुभाष शिवाजी पोळ, मु. पो. राजापूर, ता. तासगांव, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे नवीन शेतीपंपास वीज कनेक्शन मिळणेसाठी दि. १८.८.२००८ रोजी अर्ज केला व रु. ५०/– पावती क्र. ४११३३०९ ने त्याचदिवशी भरले आहेत. तक्रारदार यांनी दि. १७.३.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचा आदेश क्र. ३७८८ दि. १९.३.२०१० रोजी पारित झाला. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतची तक्रार दि. १.४.२०१० रोजी मंचासमोर तक्रारदाराने दाखल केली. कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे मुदतीत चलन दिले नाही त्यामुळे झालेल्या विलंबापोटी भरपाई मिळावे अशी मागणी केली.

वितरण कंपनीने आपल्या दि. २८.४.२०१० च्या लेखी अहवालात अर्जादारास दि. ३१.३.२०१० रोजी चलन दिल्याचे मान्य केले आहे. तक्रारदार यांनी दि. १०.५.२०१० चे मंचास अग्रेषित केलेल्या पत्रात माझी तक्रार मागे घेत आहे, तक्रार रद्द करावी असे लेखी दिले आहे. तसेच प्रतिनिधी श्री. खापरे यांना दिलेले संमत्ती पत्र मागे घेत आहे असे म्हटले आहे.

सदर प्रकरणाची सुनावणी मंचासमोर घेण्यात आली असतां, श्री. खापरे उपस्थित, श्री. सुर्यवंशी, सहाय्यक अभियंता, तासगांव २ उप विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी अधिकारपत्र रद्द केल्याचे मान्य केले आहे व श्री. सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांस दि. २६.४.२०१० रोजी वीज कनेक्शन दिले आहे असे सांगितले. त्यामुळे कृती मानकाची पूर्तता करण्यात वि.प.स अपयश आले असले आणि विलंबासाठी भरपाई देण्याची जबाबदारी कायद्याने त्यांचेवर असली तरी तक्रारदार यांस चलन मिळाल्यानंतर १ महिन्याच्या आंत कनेक्शन मिळाले आहे. तक्रारदार याने तक्रार मागे घेत आहे असा मंचास अर्ज दिला आहे, त्यामुळे तक्रारदाराने विलंबापोटी भरपाईचा हक्क सोडून दिला असल्याचे स्पष्ट होते. तक्रारदाराने लेखी अर्जानुसार तक्रार मागे घेतली असल्याने निकाली काढणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदाराने विलंबापोटी भरपाईची तक्रार मागे घेतल्याने निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :